जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/१०/२०२३
## दि.२२/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४९३/२०२३,भादविक ३०७,४९८(अ),३२३,५०४,५०६सह भा.ह.कायदा अधि कलम ४(२५) व म.पो.अधिनियम कलम ३७(३)(१)सह १३५ तसेच हुंडा प्रतिबंधक अधिनियम कलम ३ व ४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय २० वर्षे रा.सागरपार्क,वडगावशेरी पुणे. |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/२०२३ रोजी रात्री २१/००वा.ते दि. २२/१०/२०२३ रोजी १५/३० वा दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी.लेन नं. १ सागर पार्क,वडगावशेरी पुणे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसम याचे यातील फिर्यादी याच्याशी विवाह होवून त्या नांदण्यास नमुद ठिकाणी येथे आली असता लग्नानंतर नमुद इसम याने फिर्यादी यांच्याशी थोडे दिवस व्यवस्थित राहून त्यानंतर फिर्यादी यांना तुझे आई वडिलांनी माझ्या लग्नात खर्च केला नाही तु तुझ्या माहेरकडून ३० लाख रुपये घेवून ये असे म्हणुन वारंवार फिर्यादी यांना त्रास देऊन फिर्यादी ह्या नातेवाईकाच्या मुलाच्या वाढदिवसावरून घरी आल्या असता तेव्हा नमुद इसम हे फिर्यादीस म्हणाला तु कोठे होतीस व कोणासोबत होती असे म्हणुन फिर्यादीवर संशय घेवून शिवीगाळ करून फिर्यादी यांना लोखंडी हत्याराने डोक्यात मारून गंभीर जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.घोरपडे मो.नं.९४०३०४८७६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १६१६/२०२३,भादविक ४६१ |
| **फिर्यादी** | निलेश भाले.वय २७ वर्षे रा.भापकर मळा मांजरी लोणी काळभोर रोड मांजरी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा पासुन २२/१०/२०२३ सुमा.स्वामी समर्थ मंदीर भापकर मळा मांजरी लोणी काळभोर रोड मांजरी पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी पुजापाठ व मंदिराची व्यवस्था पाहत असतात.नमुद ठिकाणाच्या मंदीराच्या दान पेटी मधील अंदाजे रू.५०,०००/- रोख रक्कमेची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार व्ही बी जाधव मो.नं.९८२२१७९७३५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५२२/२०२३,भादविक ४२०,४०६ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४६ वर्षे रा.वानवडी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. १७/०९/२०२३ रोजी दरम्यान फिर्यादीच्या राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना वेगवेगळे टास्क देऊन जादा परतावा मिळेल असे आमिष दाखवुन व फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांना बॅकेच्या युपीआय आयडीवर ५०००/- रुपये तसेच १,६६,०००/- रु.पाठविण्यास सांगून फिर्यादी यांची १,७१,०००/- रु.ची आर्थिक फसवणूक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरी.(गुन्हे) श्री.विनय पाटणकर मो.नं.८६९१९९९६८९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ६५६/२०२३,भादविक २७९,३३८,३०४(अ).मो.वा.का.कलम ११९/१७७, १८४,१३२ |
| **फिर्यादी** | बालाजी बांगर पोलीस अंमलदार,लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/२०२३ रोजीचे ००/३० वा.चे पुर्वी एच पी पेट्रोल पंपाचे समोर,सोलापुरकडुन पुणेकडे जाणाऱ्या लेनवर,लोणी काळभोर, ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार १)गणेश विठ्ठल हवालदार वय २३ वर्षे रा.महादेवनगर, मांजरी बुद्रुक पुणे व २)आदित्य हरिदास चाटे वय २५ वर्षे रा.आंबेगाव, कात्रज पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. हनुमंत तरटे मो.नं. ९२०९०९०७६२ |

## प्रेस नोट दि.२३/१०/२०२३

## दि.२३/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते ११/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३११/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक मुलगी वय १९ वर्षे रा.भैरवनगर लेन नं ५ धानोरी पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०२३ रोजी स.०६/५५ वा. सुमा.भैरवनगर लेन नं ०५ चे बस स्टॉप जवळ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरून कॉलेजला पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून फिर्यादी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील १०,०००/-रू.किं.ची सोन्याचे चैन जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सत्यवान गेंड मो.नं.८०८०२८५२९१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**